दै. गोदातीर दि. 01/04/25

# पिस्तूल व दोन काडतूसं जप्त; वजिराबाद पोलिसांची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरात कमरेला पिस्तूल लावून दहशत पसरविणाऱ्या आरोपीस गोवर्धन घाट स्मशानभूमी परिसरातून वजिराबाद पोलिसांनी एकाला अटक केली आहे. त्याच्याकडून एक पिस्तूल आणि दोन काडतूसं जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई ३० मार्च रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्ट्रीट सेफ्टी ड्राईव्हअंतर्गत स्ट्रीट सेफ्टी पथक आणि शहरातील सर्व पोलीस स्टेशन यांना भारतीय हत्यार कायद्यान्वये कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. त्याअंतर्गत दि. ३० मार्च रोजी डीबी पथकाचे अंमलदार यांनी पेट्रोलिंग करीत मस्जिद येथे भेटी देत असताना गुप्तबातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गोवर्धन घाट येथील स्मशानभुमीच्या बाजूला एक युवक गावठी पिस्तुल घेऊन वावरत आहे. या माहितीच्या आधारे दोन पंचांना बोलावून सायंकाळी ५.४० वाजेच्या सुमारास गोवर्धनघाट स्मशानभूमी येथे तुषार सुधाकर सोनवणे (२२) रा. बौद्ध विहाराजवळ गोवर्धनघाट टेकडा, नांदेड या युवकास ताब्यात घेऊन त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल व त्यात अडकलेले दोन रिकामे काडतूस जप्त करण्यात आले. सदर गावठी पिस्तुल व रिकामे काडतुसची अंदाजे किंमत अंदाजे १५ हजार रुपये असून त्यास ताब्यात घेऊन त्याच्याविरूद्ध वजिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी वजिराबाद ठाण्यात वजिराबाद गुरनं. १३७/२०२५ कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून तपास पोलीस उपनिरीक्षक बालाजी किरवले करत आहेत.